महाराष्ट्र शासन
# उपनिबंधक सहकारी संस्था
मुंबई पश्चिम उपनगरे, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई
पत्ता :- गृहनिर्माण भवन, रुम नं. २११, १ ला मजला, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल आयडी – drwsmhada@gmail.com दुरध्वनी क्र. ६६४०५००१, ६६४०५२२३

जा.क्र. मुंबई उपनि/ससं(मु.प.उ.)/669 /२०२४
दिनांक :- 14/०२/२०२४

**प्रति,**
अध्यक्ष / सचिव,
सराफ चौधरी नगर को.ऑप.हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.,
अ/०६, ५१-५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल,
कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१

**विषय :-** संस्थेच्या पुर्नविकासाकरीता विकासक निवडीकरीता विशेष सर्वसाधारण सभेस प्राधिकृत प्रतिनिधी नियुक्त करणेबाबत.
सराफ चौधरी नगर को.ऑप.हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.,
संदर्भ :- आपला या कार्यालयास दिनांक ०८.१२.२०२३ रोजी प्राप्त प्रस्ताव

आपले लक्ष उपरोक्त संदर्भिय विषयांकडे वेधण्यात येत असून कळविण्यात येते की, सराफ चौधरी नगर को.ऑप.हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि., अ/०६, ५१-५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१ या संस्थेच्या पुर्नविकासाकरीता विशेष सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्यासाठी प्राधिकृत अधिकारी पाठविण्याची विनंती केली आहे.

२/- वरील बाबतीत आपणास कळविण्यात येते की, शासनाचे पुर्नविकासाबाबतचे दिनांक ०४/०७/२०१९ रोजीच्या निर्देशामधील तरतुदीनुसार आपल्या संस्थेच्या पुर्नविकासाच्या विशेष सभेसाठी श्री. सतिश. के. माने, सहकार अधिकारी श्रेणी - १ यांची नियुक्ती करण्यात येत आहे. सदर प्राधिकृत यांचे उपस्थितीत संस्थेची पुर्नविकासासाठी विकासक निवडीसाठीची विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात यावी. सदर सर्वसाधारण सभेचे व्हिडीओ चलचित्रीकरण करावे. त्यासाठी येणार खर्च संस्थेच्या निधीतून करण्यात यावा. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेच्या अध्यक्षांच्या स्वाक्षरीने या कार्यालयास सादर करावे. तसेच सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १२/०५/२०२२ रोजी निर्गमित केलेल्या सुचनांनुसार सभेचे आयोजन करण्याची कार्यवाही करावी. तसेच दिनांक ०४/०७/२०१९ च्या शासन निर्णयात नमुद मुद्दा क्र. १८ मधील ११ मध्ये नमुद केल्याप्रमाणे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर पुर्नविकसित इमारतीतील सदनिकांचे वाटप करताना शक्य तेथे सध्याचे स्थितीनुसार मजल्याच्या क्रमाने वाटप करण्यात यावे व सोडत पध्दतीने सदनिका वितरण करणे आवश्यक झाल्यास इमारत पुर्ण झाल्यानंतर विकासकाने सदनिकांच्या सोडतीची व्यवस्था करावी व त्यावेळी निबंधकाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत सोडतीने सदनिकांचे वितरण व त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करावे.

सही/- 14/2
(आदिनाथ दगडे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई पश्चिम उपनगरे,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई

**<u>प्रत माहितीसाठी :-</u>**
प्राधिकृत अधिकारी, श्री. सतिश. के. माने, सहकार अधिकारी श्रेणी- १
२/- आपणास कळविण्यात येते की, वरील संस्थेने आयोजित करावयाच्या सभेस उपस्थित राहून सविस्तर अहवाल कार्यालयास सादर करावा.